सोलापूर तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १४ जानेवारी २०२६

आतील पानावर
पान २– गरज नसलेल्या नात्यात राहणार नाही
पान ३–अनुष्काला मिळाला मोठा बायोपिक
पान ४– अक्षयकुमारसोबत झळकणार राणी?
पान ५– समांथाचा नवा चित्रपट येतोय!
पान ६ – मुक्ता बर्वेचा नवा चित्रपट लवकरच!

# रणवीर झळकणार साऊथ अभिनेत्रीसोबत

बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंगचा 'धुरंधर' सिनेमा यशाच्या शिखरावर आहे. ह्या चित्रपटाला रिलीज होऊन एक महिना पूर्ण झाला असून, आजही हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. या चित्रपटातील रणवीरच्या अभिनयासह त्याच्या लुकने सर्वांची मनं जिंकली. या चित्रपटाच्या यशानंतर आता रणवीरला आणखी एका चित्रपटाची लॉटरी लागली आहे. 'धुरंधर'नंतर रणवीर सिंग लवकरच चित्रपट 'प्रलय' या आगामी थ्रिलरमध्ये दिसणार आहे. या चित्रपटात रणवीर सिंगसोबत ३२ वर्षीय सुंदर साऊथ इंडियन अभिनेत्री दिसणार आहे. दक्षिणेतील लोकप्रिय अभिनेत्री लोका-चॅप्टर चंद्र फेम कल्याणी प्रियदर्शन त्याच्यासोबत स्क्रिन शेअर करताना दिसणार आहे. या सिनेमातून कल्याणी प्रियदर्शन हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण करते आहे. तिला हंसल मेहता यांच्या मुलगा जय मेहता दिग्दर्शित झॉम्बी थ्रिलर 'प्रलय'मध्ये रणवीरसोबत कास्ट करण्यात आले आहे. 'प्रलय' मोठ्या बजेटवर बनणारा चित्रपट आहे, ज्यात जबरदस्त व्हिज्युअल इफेक्ट्सवर विशेष लक्ष दिले गेले आहे. कल्याणी बहुतांश मल्याळम चित्रपटांचाच भाग राहिली असून तिच्यासाठी याद्वारे यश मिळवण्याची सुवर्णसंधी असेल. दरम्यान, निर्माते एप्रिल २०२६ मध्ये 'प्रलय' चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात करतील. दुसरीकडे, 'धुरंधर'ने बॉक्स ऑफिसवर आपली जादू कायम ठेवली आहे. ३० दिवसांच्या आतच या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर आतापर्यंत ७७२.२५ कोटी रुपये कमाई केली आहे. या चित्रपटाच्या यशानंतर प्रेक्षक 'धुरंधर २'ची आतुरतेने वाट पाहत आहेत.





# गरज नसलेल्या नात्यात राहणार नाही

शेफाली शाह व तिचा पूर्वाश्रमीचा पती हर्ष छाया यांनी १९९६ साली आलेल्या 'हसरतें' मालिकेत काम केलं होतं. हर्ष व शेफालीने १९९४ मध्ये लग्न केलं होतं. पण काही वर्षांनी ते विभक्त झाले. तो काळ खूप कठीण होता. त्या नात्यात राहणं खूप कठीण होतं, त्यामुळे घटस्फोट घ्यायचं ठरवलं, असं शेफालीने सांगितलंय.

एका मुलाखतीत शेफाली म्हणाली, मला कोणीही म्हटलं नाही की तू जशी आहेस, तशी परिपूर्ण आहेस. परिपूर्ण होण्यासाठी तुला पती, मित्र, भाऊ किंवा बहिणीची गरज नाही. तूच पुरेशी आहेस. त्यातही जर तुमची नाती चांगली असतील, तर चांगलंय; पण नसतील तर त्यावरून तुमची व्हॅल्यू ठरवली जात नाही, हे मला कोणीच कधीच सांगितलं नाही. आयुष्यात बऱ्याच गोष्टी घडत असतात, तुम्ही कठीण काळातून जात असता, पण अचानक एक वेळ अशी येते जेव्हा ती तुमच्यासाठी 'करो वा मरो' अशी परिस्थिती असते. तेव्हाच तुम्हाला ही जाणीव होते. हे कदाचित दररोज घडत असेल, पण मग तो एक क्षण येतो जेव्हा तुम्हाला वाटतं, 'ही गोष्ट माझा जीव घेऊ शकते. मी हे यापुढे सहन करू शकत नाही.' घटस्फोटाचा निर्णय घेताना तिने तिच्या मैत्रिणीशी त्यावर चर्चा केली होती. त्याची निर्णय घेण्यास कशी मदत झाली, तेही शेफालीने नमूद केलं. मला वाटतं की असं मला माझ्या पहिल्या लग्नानंतर वाटू लागलं होतं. मला आठवतंय, माझ्या एका खूप जवळच्या मैत्रिणीने मला विचारलं होतं, 'जर तुला तुझ्या आयुष्यात कधीच कोणी भेटलं नाही तर? तू ती जोखीम घेशील, की त्या लग्नाच्या नात्यातच राहायला प्राधान्य देशील?' आणि मी म्हटलं, 'नाही, मी ती जोखीम पत्करेन. जर मला आयुष्यभर एकटं राहावं लागलं, तर मी राहीन. पण मला आनंदी वाटत नाही, आत्मविश्वास वाटत नाही, जिथे माझी गरज नाही, अशा नात्यात मी राहणार नाही, असं शेफाली शाह म्हणाली. शेफाली शाहने विभक्त झाल्यानंतरच्या काळाबद्दलही सांगितलं. शेफाली घटस्फोटानंतर एकटी राहत होती. घटस्फोटानंतर मी वेगळी राहायला गेले. मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच एकटी राहिले होते. माझे आई-वडील माझ्याबरोबर राहत नव्हते. मी वर्षभर एकटीच राहिले. मला वाटतं, त्यामुळे फारसा काही फरक पडला नाही, असं शेफालीने सांगितलं. शेफालीने हर्ष छायापासून घटस्फोट घेतल्यानंतर काही काळाने दिग्दर्शक, निर्माते विपुल शाह यांच्याशी लग्न केलं. दोघांच्या लग्नाला २५ वर्षे झाली असून त्यांना दोन मुलं आहेत. विपुल यांच्याशी लग्न केल्यानंतर कामाच्या तासांबद्दल, सतत काम करण्याबद्दल सासू- सासरे प्रश्न विचारायचे. पण विपुल यांना ते काहीच बोलायचे नाहीत, असंही शेफाली शाह हिने म्हटलं होतं.

# तर मी माधुरीशी लग्न केलं असते



अभिनेता गोविंदा मागील काही काळापासून आपल्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. गोविंदाने बॉलीवूडची धक धक गर्ल माधुरी दीक्षितचं कौतुक केलं आणि माधुरी खूप आवडायची असं म्हटलं होतं. इतकंच नाही तर माधुरीशी लग्न करायला तयार होतो, असंही त्याने नमूद केलं होतं. गोविंदाने म्हटलं की, तो माधुरीशी लग्न करायला तयार होता, पण पत्नी सुनीतामुळे तो लग्न करू शकला नाही. मुलाखतीत गोविंदाने काय म्हटलं होतं, ते जाणून घेऊया... गोविंदा म्हणाला, मी सुनीताला नेहमी म्हणतो तू मला लग्नाला होकार दिला नसतास तर मी माधुरीशी लग्न केलं असतं. माधुरी ही माझी आवडती अभिनेत्री आहे, तिचा स्वभाव खूप चांगला आहे. तिचे सर्वांशी चांगले सबंध आहेत. ती मैत्री निभावते, असं गोविंदा माधुरीचं कौतुक करत म्हणाला होता. मी सुनीताला म्हणायचो की, तिचा स्वभाव खूप चांगला आहे. तिचे संस्कार चांगले आहेत आणि कोणताही दिखावा नाही. ती नाटक करतेय असंही वाटत नाही, मला तिच्याबद्दलच्या याच गोष्टी खूप आवडतात, असं गोविंदाने म्हटलं होतं. गोविंदाला विचारण्यात आलं की त्याने कधी माधुरीसमोर हे म्हटलंय का? यावर तो म्हणाला, मला एकदा संधी मिळाली होती, तर मी स्टेजवरच हे बोललो होतो. याचबरोबर गोविंदाने इतर अभिनेत्रींचेही कौतुक केले. ज्या अभिनेत्रींबरोबर त्याने काम केलं, त्या सर्वच अभिनेत्री चांगल्या होत्या, असं तो म्हणाला. त्याने आपल्या चित्रपटांच्या यशाचे श्रेयही अभिनेत्रींना दिले. माधुरी दीक्षित व गोविंदा यांनी पाप का अंत, 'महासंग्राम', 'बडे मियाँ छोटे मियाँ' यांसारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं होतं. प्रेक्षकांना त्यांची जोडी खूप आवडली होती. 'बडे मियाँ छोटे मियाँ' मध्ये अमिताभ बच्चनदेखील होते. दरम्यान, गोविंदा व सुनिता आहुजा मागील काही महिन्यांपासून सातत्याने चर्चेत आहेत. गोविंदाचं मराठी अभिनेत्रीबरोबर अफेअर असल्याच्या अफवा आहेत. त्याबद्दल बोलताना सुनीताने नाराजी व्यक्त केली. सुनीता व गोविंदा बऱ्याच वर्षांपासून वेगळे राहत आहेत. इतकंच नाही तर सुनीताने घटस्फोटासाठी अर्ज केला होता. पण नंतर तिने तो अर्ज मागे घेतला होता.

# ...तेव्हा मी उशीत डोके ठेवून रडते



अभिनेत्री नेहा धुपिया २० वर्षांहून अधिक काळ बॉलिवूडमध्ये आहे, पण तरीही तिला बराच काळ कामासाठी संघर्ष करावा लागतो, पण ज्यावेळी तिच्याकडे काम नसते त्यावेळी ती काय करते याबाबत अभिनेत्रीने काही गोष्टी उघड केल्या आहेत. नुकतीच तिने एक मुलाखत दिली. अभिनेत्री नेहा धुपियाने तिच्या आत्तापर्यंतच्या बॉलीवूड इंडस्ट्रीत अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. तिने मुख्य अभिनेत्रीपासून ते सहाय्यक अभिनेत्रीपर्यंतच्या भूमिका साकारल्या आहेत. अर्थात ती अजूनही चित्रपटांमध्ये सक्रिय आहे, परंतु जेव्हा तिला काम मिळत नाही तेव्हा रिकामे बसणे तिला खूप वेदनादायक असते असे मत अभिनेत्रीने व्यक्त केले आहे. हे केवळ व्यावसायिकदृष्ट्याच नाही तर भावनिकदृष्ट्याही देखील कठीण आहे, असे देखील अभिनेत्री म्हणाली आहे. जेव्हा मी काम करत नाही तेव्हा मला काळजी वाटते. माझ्याकडे परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या स्वतःच्या पद्धती आहेत.


वीस वर्षे इंडस्ट्रीमध्ये काम केल्यानंतरही जेव्हा काम मिळत नाही, तेव्हा मी उशीत डोके ठेवून रडते. मी ते तीन दिवसांपूर्वी केले होते, असा खुलासा अभिनेत्रीने केला आहे. अभिनेत्रीने कलाकारांना काळजीमुक्त राहण्याचा सल्ला दिला जात असला तरी, प्रत्येक गोष्टीचा त्यांच्यावर परिणाम होतो, असेही तिने नमूद केले आहे. सर्वात कठीण भाग म्हणजे तुमच्या आजूबाजूला असलेल्या सर्वांना काम करताना पाहणे आणि तुम्हाला रिकामे वाटणे याचे शिल्प खूप त्रासदायक असते, असे अभिनेत्री नेहा धुपियाने सांगितले. माझ्यात आणि एका नवीन कलाकारात फरक फक्त एवढाच आहे की मी या परिस्थितींना हाताळण्याची क्षमता बाळगते. जेव्हा तुम्हाला तीन ते चार वर्षे अभिनयाचे काम मिळत नाही तेव्हा ते खूप थकवणारे असते. पण देवाच्या कृपेने, मी कधीही पूर्णपणे बेरोजगार राहिलेली नाही. हा उद्योग नक्कीच थकवणारा आहे, पण तो फायदेशीर आ

# ‘धुरंधर’साठी रणवीरने घटवलं १५ किलो वजन

‘धुरंधर’च्या यशानंतरही रणवीर सिंहने वेगळा मार्ग निवडला आहे. प्रत्येक कार्यक्रमात उत्साही दिसणारा रणवीर सध्या चर्चेपासून दूर आहे. त्याच्या कोणत्याही मुलाखती नाहीत, पोस्ट नाहीत आणि सार्वजनिक कार्यक्रमांत फारशी उपस्थितीही दिसत नाही. २०१९ मध्ये आलेल्या ‘गली बॉय’ या चित्रपटानंतर रणवीर सिंहला बराच काळ बॉक्स ऑफिसवर असे यश मिळाले नव्हते. ‘जयेशभाई जोरदार’ आणि ‘सर्कस’ या चित्रपटांनाही खास प्रतिसाद मिळाला नाही. या काळात करण जोहर दिग्दर्शित ‘रॉकी और रानी की प्रेम कहानी’ याच एकमेव चित्रपटाला सम ीक्षकांची पसंती मिळाली आणि बॉक्स ऑफिसवरही यश मिळालं. ‘धुरंधर’च्या प्रदर्शनानंतर रणवीर सिंहनं एकदाच इन्स्टाग्रामवर स्टोरी पोस्ट करीत, नशिबाची एक खूप सुंदर सवय असते. योग्य वेळ आली की, ते नक्कीच बदलतं; पण तोपर्यंत आशा आणि संयम ठेवा, असं म्हटलं होतं. अशातच आता फोटोग्राफर वीरेंद्र चावला यांनी रणवीर त्यांना भेटल्यानंतर ‘धुरंधर’बद्दल काय म्हणाला याबद्दल सांगितलं आहे. चावला म्हणाले, जेव्हा पीआरनं आमची भेट घडवून दिली तेव्हा त्यानं मला एक गोष्ट सांगितली की, पाजी मी खूप मेहनत केली आहे. जेव्हा मी त्याला पुन्हा भेटलो तेव्हासुद्धा तो, ‘पाजी, मी खरंच खूप मेहनत केली आहे’, असंच म्हणाला. वीरेंद्र रणवीरबद्दल पुढे म्हणाले, रणवीरनं मला सांगितलं की, त्यानं या भूमिकेसाठी १५ किलो वजन घटवलं आणि खरं सागायचं तर, जेव्हा मी थिएटरमधून बाहेर पडलो तेव्हा मला त्यानं किती मेहनत घेतली याची जाणीव झाली. मी त्याला मेसेज करून सांगितलं की, मला चित्रपट खूप आवडला आणि तेव्हासुद्धा त्याचा असाच रिपलाय होता की, मी खूप मेहनत घेतली आहे. दरम्यान, रणवीर सिंह येत्या काळात ‘धुरंधर’च्या सीक्केलमधून आणि जय मेहता यांच्या ‘प्रलय’ या चित्रपटातून झळकणार आहे.



# ‘नायक’ सिनेमाचा २५ वर्षांनी येणार सीक्वेल?



२०२६ या वर्षात अनेक गाजलेल्या बॉलीवूड सिनेमांचे सीक्वेल प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. ‘हेरा फेरी ३’बद्दल गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे. त्यातच काही दिवसांपूर्वी ‘३ इडियट्स’ सिनेमाचा सीक्वेल येणार असल्याचं वृत्तसुद्धा समोर आलं. अशातच आता यात आणखी एका सिनेमाची भर पडणार आहे. या वर्षात अनिल कपूर यांच्या एका गाजलेल्या सिनेमाचा सीक्वेल येणार आहे. अनिल कपूर सिनेमात एका दिवसासाठी मुख्यमंत्री बनले होते तो ‘नायक’ सिनेमा आठवतोय का? नव्वदच्या दशकात जन्मलेल्या अनेक मंडळींनी त्यांच्या लहानपणी अनिल कपूर यांचा हा सिनेमा टीव्हीवर असंख्यवेळा पाहिला असेलच. याच सिनेमाचा सीक्वेल आता प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

अनिल कपूर यांचा २००१ साली प्रदर्शित झालेला ‘नायक’ सिनेमा आता जवळपास २५ वर्षांनंतर पुन्हा एकदा येणार आहे, अशी चर्चा आहे. काही अहवालांनुसार, अनिल कपूर यांनी या चित्रपटाचे हक्क विकत घेतले असून त्याचा सीक्वेल (नायक २) करण्याची त्यांची इच्छा आहे. वर्षानुवर्षे या चित्रपटाची लोकप्रियता वाढत असल्यानं हा सिनेमा पुन्हा मोठ्या पडद्यावर यावा अशी त्यांची इच्छा आहे. माहितीनुसार, ‘सनम तेरी कसम’चे निर्माते दीपक मुकुट यांच्याकडे ‘नायक’चे हक्क होते. ते हक्क अनिल कपूर यांनी त्यांच्याकडून विकत घेतले आहेत. हा चित्रपट त्यांच्या खूप जवळचा असल्याने या चित्रपटाचा दुसरा भाग बनवण्याची त्यांची इच्छा आहे. अर्थात, ‘नायक २’बाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. ए. एस. रत्नम यांनी निर्मिती केलेल्या ‘नायक’ चित्रपटात एका निर्भय पत्रकाराची कथा दाखवण्यात आली होती, जो एका दिवसासाठी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री बनतो आणि त्या मर्यादित वेळेत अनेक धाडसी निर्णय घेतो. प्रदर्शित होताना चित्रपटाला संमिश्र प्रतिक्रिया मिळाल्या होत्या. पण हळूहळू तो प्रेक्षकांच्या मनात घर करून गेला आणि पुढे जाऊन त्याला कल्ट चित्रपटाचा दर्जा मिळाला. सामान्य माणूस भ्रष्टाचार आणि व्यवस्थेविरोधात उभा राहतो, ही ‘नायक’ चित्रपटाची मुख्य संकल्पना आजही तितकीच महत्त्वाची आहे. हाच मुद्दा अनिल कपूर यांना पुन्हा या कथेकडे वळवतो, असे सांगितले जाते. त्यामुळेच ‘नायक २’ आजच्या राजकीय वास्तवावर आधारित असण्याची शक्यता आहे. ‘नायक’ चित्रपटात अनिल कपूर यांच्यासह राणी मुखर्जी मुख्य भूमिकेत होती. तसंच अमरीश पुरी, परेश रावल, सौरभ शुक्ला, जॉनी लीव्हर, शिवाजी साटम आणि नीना कुलकर्णी यांनीही लक्षवेधी भूमिका साकारल्या होत्या. तर अभिनेत्री सुष्मिता सेनही या सिनेमातील एका खास गाण्यात झळकली होती.



# अनुष्काला मिळाला मोठा बायोपिक

आता महाराणी अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनावर आधारित भव्य चित्रपटाची तयारी केली जात आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शक देव मनोरिया करणार आहे. देव मनोरिया हाच चित्रपटात अहिल्याबाई यांचे पती होळकर यांची व्यक्तिरेखा साकारणार आहे. या चित्रपटाचे बहुतांश चित्रिकरण प्रयागराज, वाराणसी आणि लखनौ येथे पार पडणार आहे. याची सर्व तयारी आतापासूनच केली जातेय. तर चित्रपटाच्या काही हिस्स्यांचे चित्रिकरण मध्यप्रदेशात करण्यात येणार आहे. या चित्रपटात दक्षिणेतील आघाडीची अभिनेत्री दिसून येणार असल्याचे बोलले जातेय. दिग्दर्शकाकडून अनुष्का शेट्टीचे नाव समोर करण्यात आले आहे. मनोरियाने अनुष्काशी यासंबंधी चर्चाही केली आहे. या चित्रपटाचे बजेट सुमारे १८०० कोटी रुपये असणार आहे. या चित्रपटातील अन्य कलाकारांची नावे अद्याप ठरलेली नाहीत. या चित्रपटात अनुष्का शेट्टीची वर्णी लागल्यास तिच्यासाठी ही मोठी संधी ठरणार आहे. यानिमित्ताने तिला पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर चाहते निर्माण करता येणार आहेत.



# कंगनाने केली नव्या चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात

बॉलीवूडमधील स्पष्टवक्ती अभिनेत्री आणि हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघाच्या खासदार कंगना रनौत बराच काळ चित्रपटसृष्टीपासून दूर होती. या काळात ती प्रामुख्याने राजकारणात सक्रिय होती. संसदेत काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्यावर केलेल्या जोरदार टीकेनंतर आता कंगना पुन्हा एकदा आपल्या आवडत्या क्षेत्रात, म्हणजेच चित्रपटांच्या सेटवर परतली आहे. कंगनाने सोशल मीडियावर शूटिंगदरम्यानचा एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये ती सेटवर अत्यंत आनंदी आणि उत्साही दिसत आहे. या पोस्टमधून तिने आपल्या नव्या चित्रपटाची सुरुवात झाल्याची माहिती चाहत्यांना दिली आहे. कंगना रनौत सध्या 'भारत भाग्य विधाता' या नव्या चित्रपटाचं शूटिंग करत आहे. तिने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये ती दिग्दर्शक मनोज तापडिया यांच्यासोबत दिसत आहे. सेटवर सर्वांशी संवाद साधत असताना मनोज तापडिया तिला सीन समजावून सांगताना दिसतात. या व्हिडीओसोबत कंगनाने लिहिलं आहे, फिल्मच्या सेटवर परत येऊन खूप छान वाटत आहे. 'इमरजन्सी' या चित्रपटानंतर दीर्घकाळानंतर कंगना पुन्हा एका नव्या प्रोजेक्टवर काम करत आहे.

'भारत भाग्य विधाता' हा एक देशभक्तीपर चित्रपट असून, यात देशासाठी लढलेल्या आणि बलिदान दिलेल्या अशा वीरांच्या कथा मांडल्या जाणार आहेत, ज्यांची माहिती फार कमी लोकांना आहे. चित्रपटात शौर्य, त्याग आणि राष्ट्रप्रेम यांचा ठळकपणे उल्लेख असेल. या चित्रपटाची निर्मिती यूनोइया फिल्म्सच्या बबिता आशिवाल आणि फ्लोटिंग रॉक्स एंटरटेनमेंटचे आदी शर्मा करत आहेत.

चित्रपटाचं दिग्दर्शन मनोज तापडिया करत असून त्यांनी यापूर्वी 'मद्रास कॅफे', 'चीनी कम', 'एनएच१०' आणि 'माई' यांसारख्या चित्रपटांचं दिग्दर्शन केलं आहे. सध्या चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेबाबत कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. कंगनाचा शेवटचा चित्रपट 'इमरजन्सी' बॉक्स ऑफिसवर अपेक्षेप्रमाणे यशस्वी ठरला नव्हता. या चित्रपटाचं दिग्दर्शन आणि निर्मिती कंगनाने स्वतः केली होती, तसेच तिने माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली होती. सुमारे ६० कोटींच्या बजेटचा हा चित्रपट भारतात केवळ २० कोटींची कमाई करू शकला होता. आता 'भारत भाग्य विधाता'च्या माध्यमातून कंगना रनौत पुन्हा एकदा प्रेक्षकांची मनं जिंकते का, याकडे सगळ्यांचं लक्ष लागून आहे.

# अक्षयकुमारसोबत झळकणार राणी?

अभिनेता बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमारच्या ओह माय गॉड फ्रँचायझीमधील नवीन चित्रपटाबाबत एक मोठी बातमी समोर येत आहे. या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या चित्रपटात अभिनेता अक्षय कुमार पहिल्यांदाच राणी मुखर्जीसोबत काम करणार असल्याची बातमी समोर आली आहे. मीडियारिपोर्टनुसार, अक्षय कुमारसोबत राणी मुखर्जी मुख्य भूमिकेत दिसू शकते. जर ही बातमी खरी ठरली तर ही हे दोन्ही कलाकार पहिल्यांदाच एकमेकांसोबत स्क्रिन शेअर करताना दिसणार आहे. एका वृत्तानुसार, ओह माय गॉड चित्रपटाचे प्री-प्रॉडक्शन अंतिम टप्प्यात आले असून, चित्रीकरणाला २०२६ मध्ये सुरुवात करण्यात असल्याचे नियोजित आहे. या चित्रपटाच्या पहिल्या आणि दुसऱ्या भागाला प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला होता. चित्रपटाच्या विषयाने प्रेक्षकांच्या मनावर मोठा प्रभाव पाडला. त्यामुळे चित्रपटाला यश मिळाले हे जरी खरे असले तरी दुसरीकडे दोन्ही चित्रपटांना विरोधही करण्यात आला होता. यावेळी तिसऱ्या भागाचे दिग्दर्शन अमित राय करत आहेत. चित्रपटाची कथा पूर्वीपेक्षा मोठी आणि अधिक संवेदनशील आणि समकालीन मुद्द्यांवर आधारित असेल, अशी माहिती सांगितली जात आहे. चित्रपटाच्या निर्मात्यांचे लक्ष केवळ मनोरंजनापुरते मर्यादित नसून सामाजिक समस्यांना चित्रपटाद्वारे प्रेक्षकांसमोर मांडणे हे असणार आहे. त्यामुळे अभिनेत्री राणी मुखर्जी नेहमीच तिच्या चित्रपटातील वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येत असते. आता ओह माय गॉड ३ मध्ये देखील ती झळकणार असल्याची चर्चा आहे.



# 'कुरळे ब्रदर्स' येणार ३० जानेवारीला!

बॉलिवूड नाताळ म्हणजे आनंद, भेटवस्तू आणि हसू आणि याच नाताळच्या निमित्ताने मराठी प्रेक्षकांसाठी एक जबरदस्त हास्याची भेट समोर आली आहे! प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे 'कुरळे ब्रदर्स' पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर धमाल करण्यासाठी सज्ज झाले आहेत. 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' या बहुप्रतिक्षित चित्रपटाचं नवं पोस्टर नुकतंच सोशल मीडियावर झळकलं असून हा चित्रपट येत्या ३० जानेवारी २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पोस्टर पाहाताच एक गोष्ट स्पष्ट होते ती, या वेळी गोंधळ डबल आहे आणि धमालही डबल!

साध्या परिस्थितीतून मोठा गोंधळ निर्माण करणारी 'साडे माडे तीन'ची ओळख या नव्या पोस्टरमधूनही ठळकपणे जाणवते आणि त्यामुळेच प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे. 'साडे माडे तीन'चा पहिला भाग आजही प्रेक्षकांच्या आठवणीत आहे. भावंडांमधील जिव्हाळा, निरागस विनोद आणि हसवणारे प्रसंग यामुळे हा चित्रपट मराठी प्रेक्षकांच्या हृदयात घर करून बसला. विशेष म्हणजे, या अविस्मरणीय पहिल्या भागाचं दिग्दर्शनही अंकुश चौधरी यांनीच केलं होतं. अभिनेता म्हणून लोकप्रिय असलेले अंकुश चौधरी दिग्दर्शक म्हणूनही तितकेच सक्षम आणि संवेदनशील असल्याचं त्यांनी अनेक चित्रपटांतून सिद्ध केलं आहे. मनोरंजन आणि कथन यांचा अचूक समतोल साधणारी त्यांची दिग्दर्शकीय हातोटीच 'साडे माडे तीन'च्या यशामागचं मोठं बळ ठरली होती. आता तब्बल एकोणीस वर्षांनंतर, त्याच आठवणींना उजाळा देत आणि आजच्या काळाशी जुळवून घेत 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' प्रेक्षकांच्या भेटीला येत असल्यामुळे उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. अंकुश चौधरी यांच्यासारख्या अनुभवी दिग्दर्शकाच्या हातात ही कथा पुन्हा एकदा साकारली जात असल्यामुळे, या वेळी हास्याबरोबरच कथेतली पकडही तितकीच भक्कम असणार, यांचा अंदाज येतोय.निर्माते अमेय खोपकर सांगतात, ''पहिला चित्रपट पाहून मोठा झालेला प्रेक्षक आणि आजचा तरुण प्रेक्षक दोघांनाही एकत्र हसवणं, हीच आमची खरी परीक्षा होती आणि मला खात्री आहे, यात आम्ही यशस्वी झालो आहोत. तर निर्माते पुष्कर यावलकर म्हणतात, आजच्या धावपळीच्या आयुष्यात दोन-अडीच तास मनमुराद हसता आलं, तर त्याहून मोठं यश नाही. या चित्रपटात अशोक सराफ, भरत जाधव, मकरंद अनासपुरे, सिद्धार्थ जाधव, रिंकू राजगुरू, संकेत पाठक, संजय नार्वेकर, समृद्धी केळकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत.


# धनुष- आनंद एल. राय चौथ्या सिनेमाच्या तयारित?

अभिनेता धनुष आणि दिग्दर्शक आनंद एल राय ही जोडी सुपरहिट आहे. 'रांझणा' हा कल्ट सिनेमा देणाऱ्या या जोडीने नंतर 'अतरंगी रे' आणि आता 'तेरे इश्क में' हा सिनेमा केला. आनंद एल. राय यांच्या सिनेमात धनुषचा एक वेगळाच अंदाज पाहायला मिळतो. प्रेम, प्रेमातलं वेड, त्यातून येणारं वादळ, दमदार क्लायमॅक्स आणि कायम लक्षात राहणारे डायलॉग्स यामुळे त्यांचा सिनेमा कायम वरचढ ठरतो. आता ही जोडी चौथा सिनेमा घेऊन येणार आहे.

रिपोर्टनुसार, आनंद एल. राय आणि धनुष चौथ्या सिनेमासाठी पुन्हा सोबत येत आहेत. हा एक पीरियड ॲक्शन रोमान्स असणार अशी चर्चा आहे. जर सिनेमाची अधिकृत घोषणा झाली तर हा येत्या वर्षातला हाय प्रोफाइल प्रोजेक्ट असणार आहे. दोघंही या पीरियड ॲक्शन रोमान्स सिनेमावर काम करत आहेत.

आतापर्यंत या जोडीने केवळ मानवी भावना आणि प्रेमातील गुंतागुंत पडद्यावर मांडली होती. मात्र, यावेळी प्रेमासोबतच ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि दमदार 'ॲक्शन'चा तडका पाहायला मिळणार आहे. अद्याप मेकर्सकडून अधिकृत घोषणा झालेली नाही. मात्र या चर्चांमुळे चाहते आतापासूनच उत्सुक आहेत. या सिनेमाचे कथानक कोणत्या कालखंडावर आधारित असेल, हे अद्याप गुलदस्त्यात असले, तरी हा आनंद एल. राय यांचा सर्वात भव्य प्रोजेक्ट पैकी एक असल्याचे बोलले जात आहे. २८ नोव्हेंबर रोजी 'तेरे इश्क में' सिनेमा रिलीज झाला. यामध्ये धनुषसोबत क्रितीची जोडी जमली होती.

सिनेमाने १४८ कोटी रुपयांचा बिझनेस केला होता. काही दिवसात सिनेमा ओटीटीवरही उपलब्ध होणार आहे. या सिनेमाचे कथानक कोणत्या कालखंडावर आधारित असेल, हे अद्याप गुलदस्त्यात असले, तरी हा आनंद एल. राय यांच्या करिअरमधील सर्वात भव्य प्रोजेक्टपैकी एक असल्याचे बोलले जात आहे.



# ऋषभ शेट्टीचा हिंदीमधील 'शंभाला'चा ट्रेलर रिलीज



आदि साई कुमारच्या 'शंभाला' चित्रपटाने तेलुगु भाषेत प्रेक्षकांचा मन जिंकून घेतल्यानंतर आता हिंदी प्रेक्षकांसमोर आपले पाऊल ठेवण्याची तयारी सुरू केली आहे. चित्रपटाचा हिंदी ट्रेलर राष्ट्रीय पुरस्कार विजेता अभिनेता-निर्देशक ऋषभ शेट्टीने प्रदर्शित केला असून, त्यामुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिकच वाढली आहे. 'शंभाला' हा एक सुपरनॅचरल थ्रिलर असून त्यात आस्था, विज्ञान आणि रहस्य यांचा विलक्षण संगम दाखवला आहे. तेलुगु वर्जन बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरल्यानंतर, हा चित्रपट ९ जानेवारी २०२६ पासून हिंदीमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाची कथा एका गावाभोवती फिरते, जिथे आकाशातून गिरी रहस्यमय प्रचंड खडकामुळे अजीबो गरीब घटना घडायला लागतात. गावात अचानक होणाऱ्या रहस्यमय हत्या, भीतीचे वातावरण आणि शतकांनु शतकांपासून चालत आलेल्या प्राचीन मान्यता लोकांच्या मनात भिती निर्माण करतात. या सर्वात प्रवेश करतो विक्रम, जो जिओ-सायंटिस्ट असून तर्क आणि विज्ञानाच्या आधारे प्रत्येक प्रश्नाला उत्तर शोधतो. विक्रमच्या भूमिकेत दिसत आहे आदि साई कुमार, ज्याला अलौकिक घटनांशी सामना करताना सत्यापर्यंत पोहोचणे सोपे जात नाही. चित्रपटाची मुख्य थीम आहे. त्यांनी 'शंभाला'द्वारे एक वेगळा सिनेमाई अनुभव साकारण्याचा प्रयत्न केला आहे. हा चित्रपट फक्त भिती निर्माण करणारा नाही, तर प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडतो की प्रत्येक अनोख्या घटनेमागे अलौकिक कारण असते की वैज्ञानिक स्पष्टीकरण. चित्रपटात आदि साई कुमारसह अर्चना अय्यर मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. शिवाय स्वासिका विजय, अन्नपूर्णम्मा, रवि वर्मा, मीसाला लक्ष्मण, शिजू मेनन, हर्षवर्धन, शिवा कार्तिक आणि शैलजा प्रिया यांसारखी अनुभवी कलाकाराचा अभिनय कथा अधिक प्रभावी बनवते आणि रहस्य वाढवते. तांत्रिक बाजूही मजबूत असून, म्युझिक श्री-चरण पकालाने दिले आहे. कॉस्च्यूम डिझाइन आयशा मरियमकडून, तर ॲक्शन सीक्वेन्स राजकुमार यांनी डिझाइन केले आहेत.

# समांथाचा नवा चित्रपट येतोय!



समांथा रुथ प्रभू ही दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री आहे. तिचे जगभरात लाखो चाहते आहेत. 'ॲक्शन क्वीन' म्हणूनही ती ओळखली जाते. समांथा सध्या तिच्या बॅक-टू-बॅक प्रोजेक्ट्समुळे चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. 'सिटाडेल: हनी बनी'नंतर समांथा आता पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर धुमाकूळ घालण्यासाठी सज्ज झाली आहे. तिच्या आगामी 'मा इंती बंगाराम' या तेलुगू चित्रपटाचे पहिले पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे.

समांथा या पोस्टरमध्ये कमालीची 'पॉवरफुल' दिसत आहे. साडी परिधान केलेल्या समांथाच्या चेहऱ्यावरील भाव प्रचंड रागीट दिसत आहेत. या पोस्टरमुळे प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. पोस्टर पाहिल्यानंतर चाहत्यांनी क्वीन इज बॅक अशा कमेंट्स करत तिच्या लूकचे भरभरून कौतुक केले आहे. पोस्टर रिलीज करण्यासोबतच निर्मात्यांनी टीझर आणि ट्रेलरच्या तारखांबद्दलही महत्त्वाची अपडेट दिली आहे. ९ जानेवारी २०२६ या चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. विशेष म्हणजे या चित्रपटाची निर्मिती समांथाचा पती राज निदिमोरू आणि डीके यांनी केली आहे. तर दिग्दर्शन नंदिनी रेड्डी यांनी केले आहे. समांथाने यापूर्वी राज आणि डीके यांच्यासोबत 'द फॅमिली मॅन २' आणि 'सिटाडेल: हनी बनी' यांसारख्या सुपरहिट वेब सीरीजमध्ये काम केले आहे. चित्रपटाव्यतिरिक्त समांथा पुन्हा एकदा एका वेब सीरिजमध्ये ॲक्शन करताना दिसणार आहे. राज निदिमोरू निर्मित रक्त ब्रह्मांड या सिरीजमध्ये ती महत्त्वपूर्ण भूमिकेत आहे. एकामागून एक ॲक्शन-पॅक प्रोजेक्ट्समुळे समांथा २०२६ मध्ये बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालण्यासाठी सज्ज झाली आहे.

# टीकाकारांना मी त्यांच्या वयाचा वाटतो



अभिनेते सचिन पिळगांवकरांचे मनोरंजनसृष्टीत मोलाचे योगदान आहे. मात्र मागील काही दिवसांपासून त्यांच्या वक्तव्यांवरून त्यांना प्रचंड ट्रोल करण्यात आलं आहे. सतत ट्रोलर्सच्या हिटलिस्टवर असलेल्या पिळगांवकरांनी अखेर ट्रोलिंगवर मौन सोडलं आहे. नुकतेच पिळगांवकर यांनी 'मी होणार सुपरस्टार: छोटे उस्ताद' या स्टार प्रवाहवरील कार्यक्रमाच्या चौथ्या पर्वानिमित्त दिलेल्या एका मुलाखतीत ट्रोल करणाऱ्यांना सडेतोड उत्तर दिले आहे. सचिन पिळगांवकर म्हणाले, 'मुळात ट्रोलिंग करणाऱ्यांना तुम्ही केलेलं काम माहीत नसेल, तर त्यांना बोलण्यात काही अर्थ नाही. करिअरच्या ६२व्या वर्षी मी त्यांना इतका महत्त्वाचा वाटत असेन, लोकप्रिय असेन, तर आजवर मी जे काही कमावलं, ती परमेश्वराची कृपा आहे. कदाचित टीकाकारांना मी त्यांच्या वयाचा वाटतो, म्हणून ते टीका करतात. माझ्यावर प्रेम करणाऱ्यांची संख्या किती मोठी आहे, याची मला जाणीव आहे. मी काम करत राहणार. तुमचं भलं व्हावं, असा आशीर्वाद टीकाकारांना देईन.' याआधी एका मुलाखतीत श्रियाने तिचे वडिल सचिन यांना ट्रोलिंग केले जात असल्याच्या प्रश्नावर म्हंटले होते की, आता या ट्रोलिंगची सवय झाली आहे की काही वाटेनासं झालं. ट्रोलर्सला काही काम नसल्याने ते टीका करतात, सोशल मीडियावरचं जग असंच आहे. त्यामुळे या गोष्टींकडे दुर्लक्ष करत चांगलं काम करत राहायचं, असा विश्वास श्रियाने व्यक्त केला होता.

# 'बँजो' सिनेमा केल्यानंतर माझं नुकसान झाल

रवी जाधव हे मराठीतील सुप्रसिद्ध दिग्दर्शक. 'कच्चा लिंबू' सिनेमातून रवी जाधव यांनी अभिनयाची चुणुकही दाखवली. रवी जाधव यांनी दिग्दर्शित केलेले 'नटरंग', 'बालगंधर्व', 'टाईमपास' हे सिनेमे चांगलेच गाजले. यानंतर काही वर्षांपूर्वी रवी यांनी रितेशसोबत 'बँजो' हा हिंदी सिनेमा केला होता. २०१६ साली आलेला 'बँजो' हा सिनेमा मात्र बॉक्स ऑफिसवर फ्लॉप झाला. या सिनेमाबद्दल रवी जाधव यांनी मनातील भावना व्यक्त केल्या आहेत. एका मुलाखतीत रवी जाधव म्हणाले, मी बँजो हा सिनेमा मराठीत करणार होतो. कास्टिंग रितेश देशमुखच होते. संगीत अजय-अतुलचं होतं. हा सिनेमा तद्दन मराठी सिनेमा होता. याची गोष्ट मराठी होती. आपले मराठीत जे बँजो पथक आहेत त्यावर हा सिनेमा होता. नटरंग हा तमाशावर होता तसं बँजो पथकातील जी मुलं आहेत जी लालबागचा राजा, चिंतामणीला वाजवतात त्यावर ती गोष्ट होती. करता करता हळूहळू ही गोष्ट हिंदी होत गेली. इसको और बडा करते है, म्हटलं चला, करुया. कारण निर्माते 'इरॉस' हे हिंदी होते. पुढे मग त्यातून अजय- अतुल बाहेर पडले. कारण त्यांना वेळ नव्हता. ते असते तर अजून गंमत आली असती. निर्मात्यांनी खूप सपोर्ट केला. प्रचंड मोठ्या स्केलवर हा सिनेमा बनला. रितेशने प्रचंड मेहनतीने त्यात काम केलं. पण सिनेमा वर्क नाही झाला. आताही फेस्टिव्हलला ती गाणी वाजवतात. पण जी अपेक्षा होती तेवढं झालं नाही. त्यावेळी पहिली गंमत काय होती, याला दिग्दर्शन येत नाही, मराठीसाठीच ठीक आहे. त्याआधी केलेल्या अनेक जाहिराती या हिंदी आहेत. त्याला मोठेमोठे पुरस्कार मिळाले आहेत. हा सिनेमा जर आधीपासून हिंदी आहे म्हणून केला असता तर मूळात बँजो विषय घेतलाच नसता. या सिनेमाचा विषय हा मराठी होता. या सिनेमाचं अख्खं लिखाण, व्यक्तिरेखा सगळी मराठी मुलं होती. हे जग हरयाणा, युपी, बिहारमधल्या लोकांना कसं दाखवू? ही गोष्ट मूळात मराठी आणि महाराष्ट्रातली असल्यामुळे ती तिथे भिडली नाही. पण यामुळे माझं वैयक्तिक पातळीवर नुकसान झालं. हिंदीत मला काम मिळणं बंद झालं. आधी ऑफर्स खूप येत होत्या. बँजोनंतर हे कमी झालं.



# मुक्ता बर्वेचा नवा चित्रपट लवकरच!



मराठी चित्रपटसृष्टीत नवनवीन प्रयोगांची लाट सुरू असताना, महाराष्ट्राची लाडकी अभिनेत्री मुक्ता बर्वे नव्या वर्षाची सुरुवात एका खास भेटीसह करत आहे. नेहमीच आशयघन, दमदार आणि आव्हानात्मक भूमिका निवडणारी मुक्ता बर्वे 'माया' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. शालिनी सिनेमाज आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन्स निर्मित 'माया' या चित्रपटाचे पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले आहे. येत्या २७ फेब्रुवारीला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. भूमिकांच्या निवडीत नेहमीच वेगळेपण जपणारी मुक्ता बर्वे'माया'मध्ये प्रमुख आणि प्रभावी भूमिकेत झळकणार आहे.

पोस्टरमध्ये मुक्तासोबत सिद्धार्थ चांदेकर, रोहिणी हट्टंगडी आणि डॉ. गिरीश ओक अशी तगडी कलाकारांची फळी दिसत असून, या चित्रपटाची कथा नेमकी काय असेल याची उत्सुकता प्रेक्षकांना लागली आहे. या चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे, घोषणेआधीच 'माया'ने आंतरराष्ट्रीय झेप घेतली आहे. या चित्रपटाची निवड २४ व्या पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलमध्ये झाली असून, ही बाब 'माया'च्या आशयघन आणि दर्जेदार कथानकाची साक्ष देते. चित्रपटाची घोषणा आणि पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलमध्ये निवड एकाचवेळी समोर आल्यामुळे 'माया' हा चित्रपट सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. मुक्ता बर्वेचा प्रत्येक चित्रपट हा अभिनयाचा नवा अनुभव असतो. त्यामुळे 'माया'मधील तिच्या भूमिकेकडून प्रेक्षकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. दिग्दर्शक आदित्य इंगळे म्हणतात, 'बिन लग्नाची गोष्ट' च्या सुखद अनुभवानंतर 'माया' हा चित्रपट घेऊन येत आहे. प्रेक्षकांमध्ये निर्माण झालेली उत्सुकता व पुणे इंटरनॅशन फिल्म फेस्टिवलमध्ये निवड होणे या दोन्ही गोष्टी आमच्यासाठी अतिशय समाधानकारक आहे. लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येईल. निर्माते डॉ. सुनील दातार म्हणतात, 'माया' हा चित्रपट आमच्यासाठी खूप खास आहे. दमदार कलाकारांची फळी आणि एक वेगळा आशय असलेला हा चित्रपट आम्ही लवकरच प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहोत. या चित्रपटाची कथा प्रेक्षकांना नक्कीच आवडेल याची खात्री आहे. शालिनी सिनेमाज आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन्स निर्मिता चित्रपटाचे दिग्दर्शन आदित्य इंगळे यांनी केले असून डॉ. सुनील दातार, नितीन प्रकाश वैद्य यांनी निर्मीती केली आहे. हा चित्रपट २७ फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे.

यहाँ बदला वफा का, बेवफाई के सिवा क्या है, मोहोब्बत कर के भी देखा, मोहोब्बत मे भी धोका है...' 'जुगनू' चित्रपटातील हे गीत १९४७ साली मोहम्मद रफी व नूरजहाँ यांच्या आवाजात खूप गाजले. सुरुवातीच्या काळातच नूरजहाँबरोबर नायकाची भूमिका मिळाल्यामुळे दिलीप कुमारच्या पुढील देदीप्यमान कारकीर्दीचे पडघम वाजले. १९४४ सालच्या 'ज्वारभाटा' चित्रपटापासून पदार्पण करणारे दिलीप कुमारची दोन- तीन वर्षे नैराश्येत गेली. चित्रपट समीक्षक बाबुराव पटेल म्हणालेही होते, तुरुंगातून सुटका झालेल्या कैद्यासारखा दिसणार्‍या दिलीप कुमारला कुठलेही भवितव्य असणार नाही. पुढे जाऊन नियतीने हे खोटे ठरविले. दिलीपकुमार, सैगल, पृथ्वीराज, मोतीलाल युग बदलवून नवीन युग प्रस्थापित करण्याच्या मागे लागले होते.

# अभिनयाचे विद्यापीठः दिलीप कुमार



'वतन की राहमे वतन के नौजवॉ शहीद हो' १९४७ साली देश स्वतंत्र झाला. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनाच्या पृष्ठभूमीवर १९४८ साली 'शहीद' चित्रपटाची प्रेमकथा कामिनी कौशल बरोबर साकार केली. अशा विषयावरची ही पहिली मुक्त अभिव्यक्ती होती. मेला, अंदाज, दिदार, बाबूल, देवदास, उडनखटोला शोकान्त असूनही इतिहास रचला होता. खर्‍या अभिनयकर्त्यांचा कलाविलास खर्‍या तत्त्ववेत्त्याच्या विचारविषयाप्रमाणे चालतो, असे 'बेकन' हा पाश्चात्य तत्ववेत्ता म्हणून गेला. दिलीप कुमार यांचा अभिनय या तत्त्वात बसत होता. कुठेही हावभाव किंवा संवादात अतिशयोक्ती न करता प्रसंग नैसर्गिक होत असत. म्हणूनच अभिनय विद्यापीठाचा कुलगुरू ठरला. त्याचवर्षी कामिनी कौशलसोबत 'नदियां के पार' या चित्रपटात अभिनयाची झलक दाखविली. त्यातील 'मोरे राजा हो ले चल नदिया के पार' हे रफी व ललिता देऊळकर (सुधीर फडके यांची पत्नी) सोबतचे गाणे लोकप्रिय ठरले.


'गाए जा गीत मिलनके तू अपने सजनके...' १९४८ साली 'मेला' चित्रपटात नरगिस लग्न होऊन साजनकडे बैलगाडीतून जाताना दिलीप कुमार बैलबंडी हाकत मुकेशच्या दर्दभर्‍या आवाजाला उत्कृष्ट अभिनित करतो. जुगनू, शहीद, मेला ओळीने आलेले चित्रपट रसिकांनी डोक्यावर घेतले. शोकान्त चित्रपटाचा महानायक म्हणून ओळख होऊ लागली. 'हम आज कही दिल खो बैठे यूं समझो किसीके हो बैठे' मेहबूब खान यांनी पाश्चिमात्य धर्तीवर आधारित आधुनिक विचारसरणीचा 'अंदाज' १९४९ साली काढला. मल्टिस्टार कास्टिंगचा पहिलाच चित्रपट असेल. दिलीप कुमार, राज कपूर, नर्गिस या तिघांत श्रेष्ठ कोण हा वाद रंगला. वरील गाण्यात पियानो वाजविताना मुकेशच्या सादगीभर्‍या आवाजाबरोबरच्या अभिनयात आपल्या प्रेमाची कल्पना देतो. 'ऐ दिल मुझे ऐसी जगह ले चल जहाँ कोई नही...' तलतच्या मुलायम स्वरातील आर्तता आपल्या जिवंत अभिनयात प्रकट करून कारुण्यालाही पाझर फोडतो. नैन मिले नैन हुये बावरे चैन कहाँ मेरे सजन सावरे' १९५१ च्या 'तराना' चित्रपटातील या गाण्याला तलत व लताच्या उत्कृष्ट द्वंद्व गीताचा मान आहे. बागेत फुललेले हे प्रणयगीत मधुबाला व दिलीप यांच्या सर्वोत्कृष्ट पडद्यावरील प्रणयाराधनेचा नमुना आहे. याच चित्रपटाद्वारे या उभयतांचे पडद्याबाहेरील प्रेम जमले होते. 'सिनेमे सुलगते है अरमा आँखोमे उदासी छायी है' वरील चित्रपटातील तलतच्या उद्ध्वस्त उदासी स्वराला दिलीप कुमारने व लता यांच्या निर्वाणीच्या स्वराला मधुबाला यांनी अक्षरशः फुलवताना कवीचे शब्द व पडद्यावरील प्रसंग यांना न्याय मिळवून दिला. 'ऐ मेरे दिल कही और चल गम की दुनियासे दिल' १९५२ सालच्या 'दाग' चित्रपटात तलतच्या मुलायम स्वरात प्रसवलेले भग्न व विषन्न भाव पडद्यावर केवळ दिलीप कुमारच सादर करू शकले.

१९५४ सालच्या 'अमर'मधले हे प्रार्थनास्वरूप गीत बॅक ग्राऊंडला पडद्यावर वरचेवर दाखवितात. दिलीप कुमारने या गाण्यातील प्रत्येक प्रसंग उठावदार वठविला. १९५५ सालच्या बिमल रॉय प्रॉडक्शनचा 'देवदास' चित्रपट दिलीप कुमारची ओळख ठरला. अशा प्रकारे ८-१० चित्रपटात ट्रॅजेडी नायक वठविल्यावर त्याला मानसिक त्रास झाला. दिलीप कुमार युसूफ खानसाठी समस्या बनला. त्यासाठी लंडनला जाऊन मानसोपचार तज्ज्ञाचे सल्ले घेतले. वापस येऊन शोकान्त चित्रपट न करता सुखद अंतांचे व कॉमेडी चित्रपट स्वीकारावे असे ठरले. गुरुदत्त यांचा 'प्यासा' चित्रपट त्याम ळेच नाकारला. 'उडे जब जब जुल्फे तेरी कुवारीयों का दिल मचले' 'मॅन वर्सेस पॉवर' अर्थात 'यंत्र हे शाप की वरदान' या तत्कालीन प्रश्नावर आधारित १९५७ सालच्या 'नया दौर' चित्रपटात दिलीप कुमार व वैजयंतीमाला या प्रणयी जोडीने अभिनव व भारदस्त अभिनयाने साहिरच्या अर्थपूर्ण काव्याने व ओ. पी. नय्यर यांच्या मधुर संगीताने, लोकनृत्यांच्या आविष्काराने चित्रपट अजरामर झाला. 'ए देश है वीर जवानो का अलबेलों का...' राष्ट्रभारणीचा संदेश व देशभक्तीचे आव्हान देणारे हे गीत बलबीर व रफी यांच्या भारदस्त व खुल्या आवाजात भांगडा नृत्यावर चित्रित झाले. दिलीप कुमार व अजित यांच्या भांगडा नृत्यातील नृत्यकौशल्याला तोड नाही. दिलीपकुमारने 'नया दौर'मध्ये सादर केलेला शंकर टांगेवाला अन्य कलाकारांची झोप उडवून गेला.

'आझाद' या पोषाखी चित्रपटात कॉमेडी व स्टंट दोन्ही प्रकार सादर केलेत. 'पैगाम' चित्रपटातही अभिनयाची उंची गाठली. दिलीप कुमारच्या सर्वांगीण अभिनयाचे पान उलगडले ते १९५९ सालच्या 'मधुमती'ने. 'सुहाना सफर और ये मोसम हसीं' शहरी बाबू दिलीप कुमार निसर्ग सान्निध्यातल्या गावी येताना हे गाणे अत्यंत आनंदी, खुशमिजास व प्रफुल्लित अंदाजात म्हणत येतो. तथापि, चित्रपटातून अढळ स्थान प्रस्थापित करून कारकीर्दीवर मानाची मोहर उठली ती १९६० च्या 'मुगल-ए-आझम'ने. सगळेच कसे डिव्हाईन! असे अजरामर प्रसंग निर्माता, निर्देशक, संगीतकार, छायाचित्रकाराच्या अफलातून कल्पनेतून व सहकार्यातूनच साकार होतात. संपूर्ण दिलीप कुमारच्या कारकीर्दीवर ओझरता प्रकाश टाकतो म्हटल्यास एका लेखात समाविष्ट करणे कठीण आहे. संपूर्ण देशभर आपल्या अलौकिक तेजाने चित्रपटात तळपणारा दिलीप नामे दिव्य तारा ७ जुलै २०२१ रोजी अकस्मात आकाशात जाऊन बसला. तिथेही आपल्या दिव्य तेजाने तळपत असेल!

**रमेश पोफळी**

# १३०० कोटी बजेटच्या चित्रपटाची रिलीज डेट जाहिर




अभिनेता गेल्या काही दिवसांपूर्वी दाक्षिणात्य अभिनेता महेश बाबू याच्या बहुचर्चित वाराणसी चित्रपटाचा एक भव्यदिव्य स्वरुपाचा चित्रपटाचा लाँच कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात स्वतः महेश बाबू आणि चित्रपटातील कास्ट उपस्थित होती. या चित्रपटाचे पोस्टर, टीझर समोर आल्यानंतर मोठी उत्सुकता चाहत्यांना लागली आहे. अशातच चित्रपटाच्या रिलीजडेट विषयी मोठी अपडेट समोर आली आहे. बाहुबली, आर. आर. आर. अशा मोठ्या स्केलवर चित्रपट तयार करणारे निर्माते, दिग्दर्शक एस. एस. राजामौली यांचा हा चित्रपट आहे. या चित्रपटाचे बजेट तब्बल १३०० कोटी रुपये असल्याची माहिती आहे. चित्रपटात महेश बाबू आणि प्रियांका चोप्रा पहिल्यांदाच एकमेकांसोबत स्क्रिन शेअर करताना दिसणार आहे.

पृथ्वीराज सुकुमारन चित्रपटात खलनायकाच्या भूमिकेत झळकणार आहे. माहितीनुसार, वाराणसी हा चित्रपट जगभरात ९ एप्रिल २०२७ रोजी प्रदर्शित करण्यात येणार असल्याची माहिती आहे. राजामौलींच्या चित्रपटाकडून अपेक्षा खूप जास्त आहेत. चित्रपटातील महेश बाबू आणि प्रियांका चोप्राचे लूक समोर आले आहेत. त्यामुळे चाहत्यांमध्ये चित्रपटाची उत्सुकता शिगेला पोहचली आहे. चित्रपटाच्या रिलीजची तारीख समोर आली असली तरी निर्मात्यांकडून अद्यापर्यंत अधिकृत कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही. हा चित्रपट २०२७ मधील महागडा चित्रपट ठरणार असल्याचे बोलले जात आहे. चित्रपटात काम करण्यासाठी अभिनेत्री प्रियांका चोप्राने ३० कोटी इतके मोठे मानधन घेतले आहे.

# तो माझा वारसा नाही!

बॉलीवूड अभिनेते अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा सध्या 'इक्कीस' चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्यामध्ये तो मुख्य भूमिकेत आहे. आजोबा, आजी आणि मामा, मामी यांच्यापाठोपाठ अगस्त्यही आता बॉलीवूडमध्ये सक्रिय असून, त्याने बच्चन कुटुंबीयाच्या अभिनयाच्या वारशाबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. बऱ्याचदा कलाकारांच्या मुलांवर त्यांच्या कुटुंबीयांतील सदस्यांनी इंडस्ट्रीत कमावलेल्या नावामुळे प्रेशर असतं. त्यामुळे प्रेक्षकांनाही स्टार किडकडून चांगल्या कामाची अपेक्षा असते. अशातच एका मुलाखतीत अगस्त्य नंदाला आई आणि वडील अशा दोन्ही बाजूंनी अभिनयाचा मोठा वारसा असल्यानं तुला याचं दडपण येतं का, असं विचारलं असता अगस्त्यनं त्यावर प्रतिक्रिया दिली आहे.



अशातच अगस्त्यनं यावेळी बच्चन ही त्याची ओळख नसून, त्याचं आडनाव नंदा असल्याचं स्पष्ट केलं. अगस्त्य म्हणाला, मला दडपण जाणवत नाही. कारण तो माझा वारसा नाही, असं मला वाटतं. माझं आडनाव नंदा आहे. मी आधी माझ्या वडिलांचा मुलगा आहे. त्यामुळे त्यांना अभिमान वाटेल असं काम करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. तो वारसा मी जाणीवपूर्वक पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहे. अगस्त्य पुढे म्हणाला, माझे इतर कुटुंबीय अभिनय क्षेत्रात आहेत, जे कलाकार आहेत. मी त्यांच्या कामाचा आदर करतो आणि मला त्यांचं काम आवडतं. पण, मला नाही वाटत की, मी त्यांच्यासारखा कधी बनू शकेन. त्यामुळे तसा विचार करून वेळ घालवण्यात अर्थ नाही. अगस्त्य नंदाची आई श्वेता या अमिताभ यांची मुलगी आहे: तर त्याचे वडील निखिल नंदा यांच्या आई नीतू या बॉलीवूड अभिनेते राज कपूर यांच्या कन्या आहेत. त्यामुळे अगस्त्यच्या दोन्ही कुटुंबीयांचं अभिनय क्षेत्रात नाव असल्यानं त्याच्याकडूनही प्रेक्षकांना मोठ्या अपेक्षा आहेत.

# 'अशी' करते तापसी चित्रपटांची निवड

प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्री तापसी पन्नूने तिच्या करिअरविषयी भाष्य करताना मोठा खुलासा केला आहे. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत तापसीने इंडस्ट्रीमध्ये येण्यामागचे तिचे कारण आणि ती चित्रपटाची निवड करताना कोणती काळजी घेते याविषयी सांगितले आहे. अभिनेत्री तापसी पन्नूचा चाहतावर्ग मोठा असून, ती तिच्या अभिनय आणि वेगवेगळ्या लुकमुळे सोशल मीडियावर चर्चेत असते. याशिवाय तिची बेधडक वक्तव्य देखील चर्चेत असतात. तापसी नेहमी वेगवेगळ्या मुद्द्यांवर आपले विचार प्ररखडपणे मांडत असते. अनेकांना तिच्या विचार पटतात तर काही तिच्या विचारांशी अहसमती देखील दर्शवतात. काही चित्रपट फ्लॉप दिल्यानंतर तापसीला अनेक गोष्टींना सामोरे जावे लागले. त्यानंतर तिने चित्रपट निवडताना काळजी घेत माझे हृदय आणि माझे मन पूर्णपणे मी जे सादर करत आहे. ज्यामध्ये मी गुंतलेले असते. अशाच चित्रपटांची निवड करते म्हणून आता मी फक्त माझ्या मनाचे ऐकते, असे ती म्हणाली. चित्रपट निवडताना, असे प्रोजेक्ट निवडत नाही जे फक्त माझे बँक खाते वाढवतात, तर मी आता असे प्रोजेक्ट निवडते जे माझ्या अभिनयाला चालना देतात. त्यामुळे मी सध्या एक नवीन मार्ग निवडला आहे ज्यावर अनेक लोक चालत नाहीत, असे देखील तापसी म्हणाली. अभिनेत्री तापसी पन्नूने अनेक लक्षवेधी भूमिका केल्या आहेत. तिने प्रत्येक भूमिकांना न्याय देण्याचाच प्रयत्न केला आहे. तिने कबूल केले की तिने स्वतःची कार्यप्रणाली तयार केली असून, त्यानुसार ती काम करते. अभिनेत्रीच्या चित्रपटांबाबत बोलायचे झाल्यास ती शेवटची २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'खेल खेल में' चित्रपटात दिसली होती. त्यानंतर ती लवकरच 'वो लडकी है कहां?', 'गांधारी' आणि 'दुर्गा' या चित्रपटात दिसणार आहे.






# रश्मिका मंदानाच्या 'मायसा'चा फर्स्ट लूक रिलीज



अभिनेत्री रश्मिका मंदाना एकामागोमाग एक सुपरहिट सिनेमे देत आहे. हिंदी असो किंवा साउथ दोन्ही इंडस्ट्रीत तिचीच चर्चा आहे. 'पुष्पा २', 'सिकंदर', 'ॲनिमल' आणि नुकताच तिचा साउथमध्ये 'द गर्लफ्रेंड' रिलीज झाला. आता रश्मिकाला पुन्हा एकदा दमदार अंदाजात पाहायला मिळणार आहे. तिच्या आगामी 'मायसा' सिनेमातील पहिला लूक समोर आला आहे. रश्मिका मंदानाच्या बहुप्रतिक्षित 'मायसा' सिनेमाची पहिली झलक आली आहे.

डोळ्यात आग, धारदार नजर, हातात बंदुक, चेहऱ्यावर रक्त असा तिचा खतरनाक लूक आहे. हा सिनेमा इलेक्ट्रिफाइंग अनुभव देणारा असणार आहे. दमदार ओपनिंग नरेशनसोबत रश्मिकाला 'मायसा' म्हणून प्रेझेंट केलं जाणार आहे. जळत्या जंगलाचा सीन आणि त्यासोबत चालणारा जबरदस्त बॅकग्राऊंड स्कोर मिळून एक अतिशय तीव्र आणि प्रभावशाली माहोल बनवणारा हा सिनेमा आहे. हा एक हाय ऑक्टेन इमोशनल ॲक्शन थ्रिलर आहे. गोंड समाजाचं सांस्कृतिक स्वरुप दाखवणारा हा सिनेमा आहे. रश्मिका यामध्ये एकदम नव्या अवतारात दिसणार आहे. यामध्ये ती गोंड महिलेची भूमिका साकारत आहे ज्यामध्ये राग, तीव्र भावना, ताकद दाखवण्यात येईल. तिची ही भूमिका न केवळ दमदार आहे पण भावनापूर्णही आहे. सिनेमा प्रेक्षकांवर नक्कीच छाप सोडेल अशी आशा मेकर्सने व्यक्त केली आहे. 'मायसा'चं दिग्दर्शन रवींद्र पुल्ले यांनी केलं आहे. तर अनफॉर्म्युला फिल्म्सने सिनेमाची निर्मिती केली आहे. सिनेमाची कहाणी आदिवासींची असल्याने त्यांच्याच परिसरात सिनेमाचं शूटही झालं आहे.